
# वृक्षराजीने वेढलेली मनाली

## स्वाध्याय

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा**





उत्तर: १. काश्मीरच्या आग्नेयेला

२. पंजाबच्या उत्तरेला

३. लाहोलच्या दक्षिणेला

४. हिमालयाच्या कुशीत

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




उत्तर: १. खेड्याहून      २. शहराहून

कृ.३. ओघतक्ता पूर्ण करा.

मनालीला असे जातात

↓

पठाणकोटातून

↓

१

↓

२

↓

३

↓

४

↓

घाटातून, 'आउट' होऊन

↓

देवदारांच्या गर्दीत शिरल्यावर मनाली दिसते


उत्तर: १. नुरपूरचा किल्ला डावीकडे घालून

२. जोगिंदरनगरचा कडा चढून

३. मंडीच्या खिंडीतून

४. व्यास नदीच्या किनाऱ्याने


कृ.४. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. सारखे नागमोडी चालीने जावे.

२. नाकासमोर सरळ जाणाऱ्या रस्त्याने जाऊ नये.

कृ.५. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. खास वाढलेल्या दरात फॅशनेबल चिजा विकणारे एखादे स्टोअर.

२. सीझनलादेखील खर्चिक गिऱ्हाईकांची वाट पाहणारे एखादे उपहारगृह.

३. रुंदीपेक्षा लांबी फार असणारा एक मुख्य रस्ता.

क्र.६. ओघतक्ता पूर्ण करा.

ब्रशने काढलेल्या मनालीच्या चित्रात दिसणाऱ्या गोष्टी

↓

१

↓

२

↓

३

↓

४

↓

५

↓

६

↓

७

↓

८

↓

९

**उत्तर:** १. सुरुवातीला आणि शेवटी एक दोन फाटे फुटलेला लांबलचक रस्ता.

२. रस्त्यावर चित्रविचित्र कपड्यांतले नानावंशी स्त्री-पुरुष.

३. आगेमागे उंच चढण असलेले डोंगर.

४. डोंगरावर देवदारांची घनगर्दी.

५. दूरवर खळाळत जाणारी व्यास नदी.


६. नदीवरचा कामापुरता पूल.

७. पलीकडे डोंगर चढणीवर छोटी भात खाचरे.

८. वर दोन कुंडे व चार देवळे.

९. डोक्यावर निळेभोर आकाश.


**कृ.७. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. हिडिंबा

२. गावालगतच्या पहाडात

**कृ.८. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. दसऱ्याच्या दिवशी देवांची मिरवणूक निघते.

२. मिरवणुकीत हिडिंबेला अग्रपूजेचा मान असतो.

३. सर्व देव, देवी सजून तयार झाल्यावर उशिराने हिड्िंबा येते; मगच मिरवणूक सुरू होते.

**कृ.९. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. हिडिंबा २. वसिष्ठ ऋषी

**कृ.१०. शब्दजाल पूर्ण करा.**





**उत्तर:** १. व्यास नदीच्या उजव्या तीरावर आहे.

२. आश्रमात गरम पाण्याची कुंडे आहेत.

३. ही कुंडे भाविकांना रोगमुक्त करतात, असा समज आहे.

४. कुंडातील पाण्याला गंधकाचा दर्प येतो.

**कृ.११. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. लाहोल व कुलूला जोडणारी खिंड

२. १४,००० फूट उंचीची खिंड

३. तिबेटहून येणारे सौदागर या मार्गे कुलू-मनालीला पोहोचतात.

कृ.१२. आकृतिबंध पूर्ण करा.





उत्तर: १. देवदार २. फर
३. भूर्ज

कृ.१३. कुलू व मनाली यांच्यातील फरक लिहा.

उत्तर:

| | कुलू | मनाली |
|---|---|---|
| १. | खोऱ्याची राजधानी आहे. | खोऱ्याची राणी आहे. |
| २. | कुलूला सरकारी कामासाठी राहायचे. | मनालीला मनालीसाठी जायचे. |
| ३. | पिठामिठासाठी जायचे. | धांदल विसरून, धावपळ मिटल्यावर, तृष्णेची धाव खुंटल्यावर मनाला थोपटण्यासाठी जायचे. |

**कृ.१४. शब्दजाल पूर्ण करा.**




**उत्तर:** १. प्रेक्षणीय वास्तू


२. निसर्गाचा रुद्रावतार

३. हिमदर्शन

४. अक्राळविक्राळ डोंगरकडे

५. खोलखोल दऱ्या


**कृ.१५. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. मोठ्या निर्झरासारखी

२. बैठी

**कृ.१६. ओघतक्ता पूर्ण करा.**





**उत्तर:** १. सुकलेल्या पानांच्या सुया पावलांखाली कुजबुज करतात.

२. समोरील हिरव्या उतारावर तरवडांची, रानझेंडूंची पिवळी फुले रांगोळीसारखी दिसतात.

३. मन फुलपाखरासारखे त्या फुलांकडे धावते.

४. तोच मनाला खेचून घेणारा सफरचंदांच्या बागेतील मादक गंध वातारवणात दरवळतो.


**कृ.१७. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. गोल्डन डिलिशस २. रॉयल

३. रेड किंग

**क्र.१८. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. मोठमोठी फळे

२. गहिरे गहिरे रंग

३. रसरशीत ताजेपणा

४. चोखंदळ खवय्यालाही तृप्त करणारा स्वाद

**क्र.१९. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. झुलत्या रेशमी वस्त्रासारखा

२. सोन्याच्या खाणी

३. गंधमादन

**कृ.२०.हिमालयातील सहलीवर दोन मित्रांमधील चर्चेचे संवाद लिहा.**

**उत्तर: राघव** : काय रे जीतू, कसली एवढी तयारी चालली आहे? दोन दिवस पाहतोय, फार धावपळ करतो आहेस.

**जीतू** : अरे राघव, मी येत्या रविवारी हिमालयात अन्नपूर्णा परिक्रमेला चाललोय. त्याचीच तयारी करतोय.

**राघव** : बाप रे! अन्नपूर्णा परिक्रमा! अरे, ती फार कठीण असते. भल्याभल्यांना पूर्ण करता येत नाही, असं ऐकलंय.

**जीतू** : मी चाललोय आमच्या ट्रेकर्स ग्रुपसोबत. एकूण २२ दिवसांचा ट्रेक आहे. तीन टप्प्यांत पूर्ण करणार.

**राघव** : अच्छा. काहीही असो, शेवटी गगनभेदी हिमालयात जातो आहेस. काळजी घे स्वत:ची मुख्य म्हणजे व्यवस्थित तयारीनिशी जा.

**जीतू** : त्यासाठीच तर आठवडाभर तयारी सुरू आहे माझी.

**राघव** : चल, मी पण मदत करतो तुला बॅग भरायला.

**क्र.२१.तुम्ही प्रवास करताना एखाद्या स्थळाला भेट देता, तेव्हा त्या स्थळाविषयी कोणत्या बाबी जाणून घेता?**

**उत्तर:** जेव्हा आपण एखाद्या स्थळाला भेट देतो, तेव्हा त्या ठिकाणाशी निगडित अनेक बाबी ध्यानात घ्याव्या लागतात. प्रवासाला निघण्यापूर्वी मी त्या ठिकाणी पोहोचण्यासाठीचे मार्ग, वाहतुकीची साधने यांविषयी माहिती गोळा करतो. स्थळावर पोहोचल्यावर राहण्याची व्यवस्था कशी आहे ते शोधतो. प्रत्येक ठिकाणची स्वतंत्र खाद्यसंस्कृती असते, तिची माहिती मूळच्या स्थानिकांकडूनच प्राप्त करता येते, त्यासाठी त्यांच्याशी संवाद साधतो. स्थानिकांची जीवनपद्धती, त्यांचे सणवार, पारंपरिक लोककला यांविषयी माहिती घेतो. प्रदेशाची भौगोलिक वैशिष्ट्ये जाणून घेतो. 'बाजार' हे ठिकाण आवर्जून पाहतो; कारण खरेदीबरोबरच येथे पर्यटक व स्थानिक दोघांचीही भेट घडते. बाजारामुळे स्थळाच्याही व्यापारविषयक स्थितीचा अंदाज बांधता येतो. जवळपासच्या नद्या, तलाव, धरणे यांना भेट देतो. तसेच मंदिरे, देवळे, दर्गे यांसारखी श्रद्धास्थाने, जत्रा, महोत्सव यांमधून स्थळाच्या सांस्कृतिक जीवनाशी ओळख होते.

अशा प्रकारे, एखाद्या ठिकाणी गेल्यावर त्या ठिकाणाचा खऱ्या अर्थाने 'अनुभव' घेण्यासाठी वरील बाबी ध्यानात घेतो.

क्र.२२.पाठावर आधारित प्रश्न

१. **मनालीतील जनजीवनाविषयी वसंत बापट यांनी कोणते वर्णन केले आहे?**

**उत्तर:** 'बारा गावचं पाणी' या पुस्तकातून घेतलेल्या वसंत बापट लिखित 'वृक्षराजीने वेढलेली मनाली' या प्रवासवर्णनात लेखकाने मनाली या निसर्गरम्य ठिकाणाचे रंजक वर्णन केले आहे. काश्मीरच्या आग्नेयेला विसावलेल्या मनालीत जिथे तिथे देवदारांची घनगर्दी आहे. व्यास नदीच्या सान्निध्याने बहरलेली ही मनाली म्हणजे पर्यटकांसाठी मनाला निवांतपणे थोपटण्याचे एक ठिकाण आहे. इथे जनजीवन म्हणजे चित्रविचित्र कपड्यांतले नानावंशी स्त्री-पुरुष, जे पर्यटक म्हणून मनालीला भेट देतात. हिडिंबा ही इथली स्थलदेवता. पहाडात तिचे मंदिर असून दसऱ्याच्या जत्रेत तिला मानाचे स्थान मिळते. व्यास नदीच्या उजव्या तीरावर स्थित वसिष्ठ ऋषींच्या आश्रमात गरम पाण्याची कुंडे आहेत, ज्यात बुचकळी मारल्याने रोगमुक्ती होते, असा भाविकांचा समज आहे. येथील बाजारात एकाच मोठ्या रस्त्याला लागून एखादे चढ्या भावात फॅशनेबल वस्तू विकणारे दुकान, सीझनलाही खर्चिक गिऱ्हाईकांच्या प्रतीक्षेत

असलेले उपहारगृह दिसते. येथील रोहटांग खिंड ही लाहोल व कुलू खोऱ्यांना जोडते. तिबेटहून येणारा हा हमरस्ता. येथील लोकांचा मुख्यत्वे हिमाचलातील वन्य जमातींशी, लाहोल व स्पिती खोऱ्यांतील मंगोलवंशीय आदिवासींशी संबंध येतो. मनालीतील नदी एखाद्या मोठ्या झऱ्यासारखी आहे, येथील घरे बैठी आहेत, तर मंदिरे मानवी वस्तींना हवी असतात म्हणून आहेत. अशा प्रकारे स्वत:च्या तंद्रीत रमलेल्या मनालीतील जनजीवनही शांत, प्रसन्न व संथ आहे.

**२. मनालीच्या स्थलदेवता, ऋषींचे आश्रम आणि भौगोलिक वैशिष्ट्ये यांचे वर्णन करा.**

**उत्तर:** वसंत बापट यांनी लिहिलेले 'वृक्षराजीने वेढलेली मनाली' हे मनालीच्या सौंदर्याचे वर्णन, मनालीचे प्रत्यक्ष दर्शनच घडवते.

मनालीची स्थलदेवता आहे हिडिंबा. तिबेटच्या शेजारी असलेल्या मनालीची राखण करण्यासाठी ही स्थलदेवता भीषण असली पाहिजे असे लेखकाला वाटते. दसऱ्याच्या दिवशी निघणाऱ्या देवांच्या मिरवणुकीत अग्रपूजेचा मान असतो तो हिडिंबेलाच. ती आल्यानंतर मिरवणूक हलते. व्यास नदीच्या डाव्या तीरावर, गावालगतच्या पहाडात तिचे मंदिर आहे. उजव्या तीरावर वसिष्ठ ऋषींचा आश्रम आहे. या आश्रमाच्या परिसरात गरम पाण्याची कुंडे आहेत. भाविक रोगमुक्तीच्या आशेने त्या पाण्यात डुबकी मारतात.

मनाली काश्मीरच्या आग्नेयेला, पंजाबच्या उत्तरेला, लाहोलच्या दक्षिणेला हिमालयाच्या कुशीत वसली आहे. मनालीकडे जाणाऱ्या रस्त्यावर पठाणकोट, नुरपूरचा किल्ला, जोगिंदरनगरचा कडा, मंडीची खिंड, व्यास नदीचा किनारा अशी अनेक ठिकाणे लागतात. देवदार, फर, भूर्ज अशा अत्यंत दाट वृक्षराजींच्या कुशीत मनाली विसावली आहे. मनाली म्हणजे एक लांबलचक रस्ताच आहे. दीड-दोन हजार फूट उंचीचे कडे, दुरून वाहणारी व्यास नदी, डोंगरचढणीवर भातखाचरे, तिथेच दोन कुंडे, चार देवळे आणि डोक्यावर निळेभोर आकाश हे सर्व निसर्गरम्य मनालीची साक्ष देतात.